# <u>प्रसिध्दी पत्रक</u>

**श्री. सुनिल नारायणराव जहगीरदार, वय ४८ वर्षे, नौकरी पोलीस नाईक ब.नं.१५९६, पोलीस ठाणे सिटीचौक, औरंगाबाद शहर हे २,५००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात.**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्री. सुनिल नारायणराव जहगीरदार, वय ४८ वर्षे, नौकरी पोलीस नाईक ब.नं.१५९६, पोलीस ठाणे सिटीचौक, औरंगाबाद शहर रा. प्लॉट नं १४२, श्रीपाद कॉलनी, होनाजी नगरच्या बाजुला, जटवाडा रोड, औरंगाबाद |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक १३/११/२०१८ रोजी गायत्री वाशींग सेंटर होनाजी नगर येथे, |
| लाचेची रक्कम | :- | २,५००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या वाळु वाहतुक करणा-या वाहनावर पोलीस केस न करण्यासाठी |

यातील तक्रारदार हे शेती व वाळु व्यवसाय करतात. त्यांच्याकडे वाळु वाहतुक करण्यासाठी एक ट्रॅक्टर व ४०७ टाटा टेम्पो असुन आर्डरप्रमाणे वाळु वाहतुक करतात. वाळु वाहतुक करतांना तक्रारदार यांची वाहने पोलीस स्टेशन सिटीचौक औरंगाबाद शहर च्या हद्दीतुन वाहतुक करत असल्यामुळे पोलीस कर्मचारी श्री. सुनिल नारायणराव जहगीरदार, वय ४८ वर्षे, नौकरी पोलीस नाईक ब.नं.१५९६, पोलीस ठाणे सिटीचौक,औरंगाबाद शहर यांनी सदरच्या वाळु वाहतुक वाहनांवर पोलीस केस न करण्यासाठी प्रति महिना ३५००/- रुपयेची लाचेची मागणी तक्रारदार यांच्याकडे केली होती. परंतू तक्रारदार यांची आलोसे श्री. सुनिल नारायण जहागीरदार, नौकरी पोलीस नाईक ब.नं. १५९६ नेमणुक पोलीस सिटीचौक औरंगाबाद शहर यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १३/११/२०१८ रोजी श्री. सुनिल नारायणराव जहगीरदार, वय ४८ वर्षे, नौकरी पोलीस नाईक ब.नं.१५९६, पोलीस ठाणे सिटीचौक, औरंगाबाद शहर यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष लाचेची मागणी बाबत पडताळणी केली असता, श्री. सुनिल नारायणराव जहागीरदार यांनी तक्रारदार यांच्या वाळु वाहतुक करणा-या वाहनावर पोलीस केस न करण्यासाठी ३,५००/- रु लाचेची मागणी करून, तडजोडी अंती २,५००/- रु स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज दि.१३/११/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला असता, श्री.सुनिल नारायणराव जहागीरदार यांनी पंच साक्षीदारा समक्ष २,५००/- रुपये लाचेची रक्कम गायत्री वाशींग सेंटर, होनाजी नगर येथे तक्रारदाराकडून स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

सदर यशस्वी कारवाई करण्यासाठी पोलीस अधिक्षक डॉ. श्रीकांत परोपकारी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद, अपर पोलीस अधीक्षक श्री. शंकर जिरगे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री. नितीन देशमुख,ला.प्र.वि. औरंगाबाद, पोलीस उप अधिक्षक श्री निकाळजे, ला.प्र.वि जालना यांच्यासह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद व जालना येथील पथकाने संयुक्तरिता कारवाई केली. नमुद आरोपी यांचे विरुध्द पोलीस ठाणे बेगमपुरा औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.**

फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४

Mail ID :-१) dyspacbaurangabad@mahapolice.gov.in, २) dyspacbabad@gmail.com.

नितीन देशमुख
पोलीस उप अधिक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो,औरंगाबाद